म. ग्रं. सं. ठाणें
काव्य
२०३८

# शब्दगंध



REFBK-0023403
REFBK-0023403

सुभाष धोत्रे

संदर्भ काव्य
२४३८
२३४०३
१७/१/८२

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ [८] नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

( क्र. मा. प. )
५०००-४-८०

● प्रथम आवृत्ती
१९८१

● सुभाष तु. धोत्रे
१७२, दाणी सदन,
डॉ. आंबेडकर रोड,
ठाणे. ४०० ६०१

● मुखपृष्ठ : श्रीरंग गायकवाड
ठाणें.

● मूल्य पांच रुपये

● प्रकाशक
अरुण वर्तक / चैतन्य सोनवणें
' मनोरमा प्रकाशन '
ठाणें.

● मुद्रक : द. ल. दुलम
''गुरुकृपा मुद्रणालय''
कोपर रोड,
डोंबिवली (प.)

संदर्भ काव्य
२४३८
२३४०३
१७/१/८२

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

**सूचना** :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ [८] नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

( क्र. मा. प. )
५०००-४-८०

# ॥ प्रस्तावना ॥

## ॥ शब्द गंध ॥

**नमस्कार,**

एखाद्या विशिष्ट ध्येयपूर्तीने झपाटलेले मन, स्वतःचा मार्ग सापडे पर्यंत एका सोयिस्कर मार्गानेच जात असते. सुभाष धोत्रे हा नवोदित कवी ही त्याला अपवाद नाही. फारशी प्रसिद्धी नसताना आपली काव्य रचना संग्रहरुपाने प्रसिद्ध करण्याची त्याची जिद्द आणि आत्मविश्वास कमालीचा विलक्षण आहे. आणि जेव्हा एखाधा कवी आणि तो ही नवोदित मानला जाणारा कवी आपला स्वतंत्र असा काव्य संग्रह प्रसिद्ध करण्याचा निर्धार करतो त्या धाडसाचे खर म्हणजे दिलखुलास स्वागत करणें ही प्रशसनीय दादच ठरेल !

आपल्या कवितेचा स्वतन्त्र असा चेहरा-मोहरा काव्य रसिकांसमोर जसा आहे तसा प्रतिबिंबित करण्याचा प्रयत्न सुभाष धोत्रे याच्या 'शब्द गंधा' ने केला आहे. वास्तविक, ह्या 'शब्द गंधा' चा चेहरा संपूर्णतः स्वतंत्र नाही. कोणतंही काव्य हे सहजगतः स्वतंत्र नसते. स्वतंत्र भासले-रुचले तरी त्या मागे त्या-त्या कालावधीच्या काही काही विशिष्ठ वृत्ती-प्रवृत्ती असतात. त्या वृत्ती-प्रवृत्ती मनाला रुचतात-भावतात आणि कल्पना-भावना-विचारांचा त्रिवेणी संगम तयार होतो. ह्या संगमावरच 'स्व' चा 'स्वतंत्र' सेतू निर्माण होतो. आणि कविता जन्माला येते. मग ती केव्हा-कधी धारातिर्थी पडलेल्या जवानाच्या दुःखाचे रुप घेऊन येते तर कधी प्रेमानुभूतीचे गुंजनही करते. केव्हातरीं वास्तवतेपासून दूर जाते, निराशेने काळवंडून झुरतेही ! अशा विविधानुभूतीतून साकारीत होणाऱ्या कवितेला कोणत्याही बंधनाचे वावडे नसते. अशा काव्याला टीका-टीप्पणीचे निकष लावून, सत्यासत्यतेची पारख करणे इ. इ. ... ... ...

गंभीर सूरांची तीच ती वहीवाट मळून अधिक अन्तर्मूख केलं पाहिजे का ? नाही. अखेर ह्यातील चांगले किती हेंच आपण पहातो.

आज, अगदी त्या क्षणापर्यन्त काव्यक्षेत्राच्या प्रवासात स्थिर होण्याचा प्रयत्न 'शब्द गंन्धा' ची ही छोटीशी भरारी करीत आहे. सभोवतालचे जग बहरलेल्या मनानं जगावे आणि क्षितिजाकडे झेपावण्याचे स्वप्न रचाव. स्वप्न रचता रचताच भरारी घ्यावी कांहीस असंच स्वप्न ह्या 'शब्द गन्धा' चं आहे. ह्या स्वप्नाचा सूर मात्र बऱ्याचवेळा प्रेमभावनेचाच नाद छेडताना दिसतो. पण हा नाद देखिल काही नव्या जाणिवा देणारा आहे. शेवटी ही जाणिव 'स्व' च्या स्वतंत्र अनुभूतितूनच प्रतिसादणारी जाणिव आहे. ह्या जाणिवेचा प्रतिसाद ह्या तरुण कवीच्या रोमारोमांत भिनलेला आहे . ह्या प्रतिसादाला पुन्हा साद मिळतेय ती मात्र विरहाची ! वैफल्य मनःस्थितीतून ध्वनीत होतो तो एकाकीपणा आणि रचल्या जातात ह्या ओळी "एकटाच आलो जगीया एकटाच जाणार ... ... कवीची एकूण प्रकृतीच प्रेमकाव्य रचता रचता विरहगीत गाणारी आहे त्यामुळे ' शब्द गन्धाच्या ' कोणऱ्याही ओळीत तोच तोच सूर नादावला नाही तरच नवल ! इथे अनुभव नवा नाही पण सूर नवा आहे. हा सूर कोणत्याही कालखंडाचे प्रतिनिधीत्व मात्र करीत नाही जे अनुभूतीस आले, त्या अनुभूतीतून जें रुचले-भावले त्या अनुषंगानेच अभिव्यक्त होत गेलेली ही कविता आहे. त्यामुळे केव्हा केव्हा तोच तोच अनुभव वेगळचा सूरांतून प्रतित होतो .

" आता कुणास सांगू
व्यथा जळल्या जीवाची "

हे दुःख ओठावर असतानाच " आठवणींच्या सावल्या ह्या
मागे उभ्या राहिल्या ... "

हे शल्य हृदयात घेऊन वावरणारा कवी मध्येच
' फुललेल्या मनाला बहर प्रितीचा ग आला" म्हणत आनंदाने धुंद होता होताच
"डोळयांत साठलेले प्रेम हे भावनांचे
"ओठात दाटलेले हे शब्द भावनांचे
गुणगुणत बेहोश होऊन जातो. ह्या विविध भाव कैफात डुंबणारा हा कवी

"कैफात मी बुडालो, कैफात राहू दे ग " असं आर्ततेने विव्हल होऊन गझल छेडतानाही आढळतो. कवीला शब्दाची अचूक जाण आहे, असं असलं तरी एकूण " शब्द गन्धा ' ला अभिव्यक्तीची मर्यादा आहे. या क्षणाला " शब्द गन्धा' च्या रुपाने काव्य प्रवासाची नांदी झाली आहे. खरा सूर अजून लागायचा आहे.

मुग्ध मनाचे पडसाद उमटणाऱ्या अनेक कवितांतून प्रिती आणि वैफल्य यांचीच अभिव्यक्ती प्रकर्षाने जाणवते. ' शब्द गंधा' त वैफल्य सुद्धा बऱ्याचवेळा वैफल्यासाठी आले नसून प्रितिच्या अभिव्यक्ती साठी आलेले आहे.

" सांगू कसे प्रिये तुला, जीव हा दाटला
तुझ्याच साठी प्रिये , जीव हा दाटला ...

असा भावगर्भ जयघोष होत असतानाच"

"गातो कधी असा मी
दु:खास गिळूनी हसता,
हसतो कधी-कधी मी
कधी एकलाच असता ... "

अशी एकलेपणातून निर्माण झालेल्या वैफल्याची दाहकता आपल्याला जाणवल्या शिवाय रहात नाही.

" शब्द गंधा ' तील कवितांमध्ये बरेचसे शब्द पुन्हा पुन्हा हजेरी लावताना दिसतात. परंतू त्यामुळे एकूण कवितेच्या Form ला धक्का लागतोय असेही आढळत नाही. एकंदरीत आजच्या मराठी कवितेच्या भव्य वास्तूमध्ये स्वत:चे ' स्व 'तंत्र असे पाऊल ठेवण्याचा प्रयत्न सुभाष धोत्रे च्या "शब्द गंधा" च्या गीती-काव्यानं ( होय ! बऱ्याचशा रचना सुरेल चालबद्ध करता येण्या-सारख्या आहेत. ) केला आहे. अशा ह्या भावकाव्याशी नातं जोडणाऱ्या, उण्यापुऱ्या २६ कवितांनी मर्यादित झालेल्या ' शब्द गंधा ' च्या उपस्थितीला चोखंदळ वाचकांची मिळणारी दाद शेवटी त्यांच्या सुजाणतेवर, रसिकतेवरच अवलंबून नाही का ?

**विजया पास्ते**
भुलेश्वर, मुंबई.

# ॥ सावल्या ॥

आठवणींच्या सावल्या ह्या
मागे अुभ्या या राहिल्या
पाठशीवण स्मृति–शलाका
अंतरी या दाटल्या ॥धृ॥

चांदराती तिने दिलेल्या
भावस्पर्शी अलिंगना
चुंबूनी काया तिची ती
प्रेम–दीर्घ ते मिलना... ॥ आठवणींच्या...

ती कधी हळूवार येई
गंध वेडया भावनांनी
छेडूनी मम अंतरीची
भाव मुग्ध ती सतारी... ॥ आठवणींच्या...

आज असता एकटा मी
ती कधी ना थांबणार
आठवणी देवूनी मजला
परत कधी न भेटणार... ॥ आठवणींच्या..

●



मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२७३८
23४03
काव्य
१५/१/८२

# ॥ बंध बंध हे कसे ॥

बंध बंध हे कसे
साक्ष गंध जें तसे
प्रित ही अशी जशी
मिठीत तू हवी अशी... ॥धृ॥

सांज ही धरेवरी
चंद्र हा जलावरी
चांदण्या हसती कशा
पाहूनी तुज कर बंधनी.... ॥ बध बंध हे कसे

पक्षी हे विहरती
मधूर स्वर गुंजती
बकुळीच्या या तळी
अुमलती तू प्रेमकळी .. ॥ बंध बंध हे कसे

गध–धुंद प्रेम हे
गंध–धुंद स्वप्न हे
सत्य रुप उतरताच
दिव्य प्रेम दाटले... ॥ बंध बंध हे कसे

# ॥ तू उभा ॥

तू उभा असशील तेथे
सावली माझी असे
भावनांच्या 'भक्ति–प्रेमा'
साथ माझी ही असे... ॥धृ॥

तू दिलेल्या तारकांना
अंतरी मी स्पर्शिले
अर्पूनी मी प्रेम सारे
शब्द तुझे ते प्राशिले... ॥ तू उभा...

मी कधी ना खंत केली
दूर असता तू इथे
भावनांच्या या तरुवर
मी स्वतःला झोकीले... ॥ तू उभा...

मी उरावे अंतरी या
'पुष्प–फुल' होऊनी
वा बनूनी 'पुष्प वेल'
दारी तुझ्या मी सजावे... ॥ तू उभा...

# ॥ श्वास ॥

श्वासात श्वास माझ्या
मिसळूनी दीर्घ झाले
ही प्रीत आज प्रिया
प्रेमात दिव्य झाली... ॥धृ॥

ये या इथें अशी तू
संध्या धरेस आली
घे लोचने मिटूनी
गात्रेच धुंद झाली... ॥ श्वासात

ना तुज वीण मज कोणी
सुख-दुःख साहूनी
प्रीतित घे वाहूनी
ना सोबती मज कुणी... ॥ श्वासात...

हे श्वास दीर्घ असती
दुःखात दबूनी जाती
सावली तुझीच दिसता
सौख्यात फुलूनी जाई... ॥ श्वासात...

# ॥ कोणी ॥

जननिंदेस रोखी कोणी
विष ते प्राशिल कोणी
भीक्षेस हात पसरुनी
पुसेल दुःख कोणी... ॥धृ॥

कळा प्राण कळा त्या
प्रसूतीत प्रसवे माता
साक्षात प्राण कंठी
सोशील का कुणी... ॥ जननिंदेस

स्थितप्रज्ञ राहूनीया
होईल का प्रज्ञावंत ?
संस्कार सोडूनीया
जीवेल आत्मा कोणी... ॥ जननिंदेस

गूढ कामना मनीची
पाणावल्या ह्या लोचनीं
थकल्या मनास माझ्या
हिमस्पर्श देईल कोणी... ॥ जननिंदेस

●

## ॥ लक्ष सुखांचे लेणें ॥

फुललेल्या मनाला
बहर प्रीतिचा ग आला
तुझ्या सप्त सुगंधाने
चंद्र वेडा हा जाहला... । धृ।

तारकांच्या या थव्यात
शोधीतो चांदणी ती
भावनांच्या या सतारीस
हवी साथ तव स्वरांची... फुललेल्या...

काजव्यांच्या लकाकण्यात
तुझी काया दिव्य जाहली
लक्ष लक्ष थेंब प्राशिता
प्रीति सागरा तू बुडाली... फुललेल्या...

आता नकोच वर येणे
नको काठांवर जगणें
भोवऱ्यात ह्या प्रीतिच्या
लक्ष सुखांचे ग लेणें... ॥ फुललेल्या....

# ॥ एकटा ॥

एकटाच आलो जगीया
एकटाच जाणार
साथी नाही सोबतीला
एकटाच जाणार ! एकटाच जाणार ! एकटाच जाणार ॥धृ॥

जन्मताच अश्रू होते
माझ्याच संगतीला
मरणानेच अश्रू दिधले
माझ्याच सोबत्यांना... ॥ एकटाच.. ॥१॥

आई, बाबा, बहिण—भाऊ
त्यांच्यास्तव रमलो
स्नेहासाठी त्यांच्या जगलो
जगूनी ना उरलो... ॥ एकटाच... ॥२॥

अश्रू ढाळी सौभाग्यास्तव
जपीले कुंकूम भाळी
दोन बाळांची ती आई
पति वीण जळाली...॥ एकटाच... ॥३॥

नको आता जन्म मजला
परतूनीया इथे
सुखासाठी जगोनीया
दुःख अती राहते .. ॥ एकटाच... ॥४॥

# ॥ डोळ्यात साठलेले ॥

डोळचात साठलेले हे प्रेम भावनांचे
ओठात दाटलेले हे शब्द भावनांचे
सांगू कुणा कथा ही
वेडचा परि प्रीतिची... ॥ डोंळचात साठलेले... ॥धृ॥

मी स्वप्न-स्वप्न पहातो
कधी प्रेंम गीत गातो
गाता कधी न आले
ते सूर समिप आले... ॥ डोळचात साठलेले ॥१॥

मी आज दीप जाहलो
प्रितीत दिव्य जाहलो
माझ्या प्रकाश झोता
स्वर रागिणी मिळाली... ॥ डोळचात साठलेले ॥२॥

असंख्य काजव्यांच्या
थव्यात लुप्त जाहलो
स्वप्निल प्रीतीच्या हो
काव्यात तृप्त जाहलो... ॥ डोळचात साठलेले ॥३॥

●

# ।। आयुष्य फूल ।।

तू यें क्षणी असा तू
संध्या धरेस आली
किती वाट पाहूनी रे
प्रितीत मी जळाली ... ।।धृ।।

हर एक आठवण ही
हृदयात स्वप्न–पक्षी
भारवल्या स्मृतिना
साथ तव प्रितीची... तू ये क्षणी...।।१।।

आयुष्य फूल माझे
फुलले तुझ्याच साठी
घे स्वाद अंतरी या
गंधीत धुंद जाहले... ।। तू यें क्षणी ।।२।।

फुलल्या प्रितित माझ्या
तू भ्रमर एकटाची
प्राशुनी प्रीत सारी
गंधीत रात्र झाली... ।। तू यें क्षणी ।।३।।

## ॥ गझल ॥

कैफात मी बुडालो
कैफात राहू दे ग
हृदयात दाटलेले
हृदयात राहू दे ग ... ॥ कैफात ... ॥धृ॥

मज कैफ हा चढे हा
फैफात मी बुडें हा
बुडलो तुझ्याच साठी
अुरलो तुझ्याच साठी
अुरलो तुझ्याच साठी ... ॥ कैफात ... ॥१॥

स्वप्निल नील रात्री
मदिरेत या बुडू दे
प्राशूनि मद्य सारे
प्रीतीत या बुडू दे
प्रीतीत या बुडू दे ... ॥ कैफात ... ॥२॥

गंधीत धुंद वारे
मिठीत कंप सारे
ओठात दाटलेले
ओठांवरी रुळू दे
ओठांवरी रुळू दे ... ॥ कैफात ... ॥३॥

(पुढे)

## ॥ गझल ॥

मज साथ ना कुणाची
भीती मनी उद्याची
जगलो जरी अुद्यामी
जगशिल का अुद्यातू ?
जगशिल का अुद्यातू का ? ... ॥ कैफात ... ॥४॥

होतील गाठी-भेटी
जुळतिल नाती-गोती
जुळतिल हात माझे
जुळतिल पाऊलेही
जुळतिल पाऊलेही... ॥ कैफात ॥५॥

## ॥ हातात हात देता ॥

हातात हात देता
हृदयात साथ देता
साथी म्हणोनी कोणी
मिठीत मधूर गाता ... ॥धृ॥

मी कल्पिलेच सारे
सौख्यात धुंद वारे
पण कल्पनाच माझी
साक्षात होई राजी ... ! ... हातात ॥१॥

मी दूर राहूनिया
हुरहूर लावुनिया
पाही हळू कटाक्षे
लाजून होई चूर ... ॥हातात .... ॥२॥

येता हळूच माझ्या
स्वप्नील ताज महाली
स्पर्शताच हृदयांती
प्रितित सांज झाली ... ॥ हातात ... ॥३॥

## ॥ गातो कधी असा मी ॥

गातो कधी असा मी
दु.खास गीळूनी हसता
हसतो कधी कधी मी
एकलाच मी असता ... ॥धृ॥

मी चालतो कधी ही
कधी दिवस, कधी रात्री
आयुष्य दीर्घ माझे
न थकती पाऊलेही ... ॥ गातो कधी ॥१॥

आयृष्य सागराचे
प्राशितो ह्याच कठी
शंख शिपले स्मृतींची ही
रिती न होई ओंजळी ... ॥ गातो कधी ॥२॥

असंख्य चांदण्यांच्या
मागे असा मी धावतो
का—कधी– पण–परंतू
दाही दिशा मी संपतो .... ॥ गातोकधी ॥३॥

## ॥ सांगू कसे प्रिये तूला ॥

सांगू कसे प्रिये तूला
जीव हा दाटला
तुझ्याच साठी प्रिये
जीव हा दाटला ... ।।धृ।।

ही प्रित ही असावी कैसी चंदनी
सुगंध दरवळे कसा हो मन्मनी
ही प्रित साक्ष-साक्ष एक जीवनी
ही प्रित हो आनंदी अतरी ... ॥ सांगू कसे ।।१।।

हे श्वास हे श्वासात घुमू दे
हे प्रेम गीत मुखी गाऊ दे
हे हात ग हातांना मिळू दे
हे ओठ ग ओठांना भिडू दे ... ॥ सांगू कसे ।।२।।

तुझ्याच साठी सख्या मी ही आले
तुझ्याच जीवनाची सखी जाहले
तुझ्याच प्रितीचे हे पुष्प जाहले
पुझ्याच पाऊली मी धन्य जाहले ... ॥ सांगू कसे ।।३।

# ॥ येणार तू ॥

येणार तू कधी ना
येशील का कधी तू ?
चित्रात मूर्ति जागे
प्रतिमेत भाव मोठा ... ॥धृ॥

वाटे कधी स्मरावे
स्मृतित तू असावे
मग दाटती आंसवे ही
केंव्हा ? कधी ? ना कळावे ! ... येणार तू ॥१॥

दिलेस प्रेम-प्रेम
तेजाळूनीं कधी तू
हसलास हसवूनी तू
दुःखास लपवूनी तू ... ॥ येणार तू ॥२॥

कधी घेतले उराशी
कधी बांधिले करांनी
कधी चालुनी अखंड
कधी तृप्तिले स्वरांनी ... ॥ येणार तू ... ॥३॥

आता स्मृतिच केवळ
जपणे उरीच केवळ
अश्रूच सोबतीला
स्मरताच जीवनीया ... ॥ येंणार तू ॥४॥



मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
2038
23403
10/7/12

## ॥ सातस्वरींच्या.... ॥

आज अचानक सूर हे आले
कोठूनी सापडले .... ... ... ?
सात स्वरांच्या नादांतूनी
ते स्वर हे सापडले ... ॥धृ॥

गाणे आता गंधीत झाले
धुद या मुग्धीत
शब्द गंधले स्वरांसोबती
मखमली चालीत ... ॥ सात स्वरांच्या ॥१॥

झाले शब्द विरहाचे कधी
कधी ते हास्य रसाचे
भाव-प्रीत ही नभी दाटली
वर्षा गर्जित ... ! ॥ सात स्वरांच्या ॥२॥

आता सुटका होणें नाहीं
भाव-रसा ते जुळणें नाही
थकलें मन हे, कळणें नाहीं
केवळ जगणें, गाणें नाहीं ! .. ॥ सात स्वरांच्या ॥३॥

# ॥ धुके ॥

शब्द ही झाले मुके
पाहता तव लोचनी
भाव-भोळ्या स्मृतीचे हे
अंतरी दाटे धुके ... ॥धृ॥

भाव-भोळ्या या मनाला
लाथाडूनी तू का निघाली ?
रण रणत्या या उन्हातूनी
सोडूनी तू का निघाली ? ॥भाव-भोळ्या ॥१॥

कोमल तव प्रीतिच्या
स्मृतिचंदनी चांदण्या या
लता कुंजनी गुंजारवते
संपवूनी तू का निघाली ? ॥ भाव-भोळ्या ॥२॥

जायचेच होते तूला तर
तारकांशी का प्रीत केली
गंध-ओल्या भावनांना
स्पर्शूनी का प्रीत केली ? ॥ भाव-भोळ्या ॥३॥

सप्तपदी उधळूनी तू कां निघाली ?
साहू कसे दुःख सारे या मनी
संपला तो खेळ सारा जीवनी
फुटे हुंदका, अश्रू दाटे पांपणी ... ॥ भाव-भोळ्या ॥४॥

## ॥ गा गीत तू स्वरांनी ॥

गा गीत तू स्वरांनी
हा धुंद मी अंतरी
संगीत सूर मज हे
स्वप्नरंगी जीवनी ... ॥धृ॥

तू भास एक जीवनी
स्वर दाटू दे ग अंतरी
गा प्रेम गीत स्वरांनी
फुलताच फुले अंतरी ... ॥गा गीत ... ॥१॥

गा मधूर त्या गळ्यातूनी
मी सजवितो स्वर बासरी
तुज वाहिले प्रेम कुसुमी
जीवनी तू आसावरी ... ॥ गा गीत ॥२॥

तू धुंद हो स्वरांमध्ये
मी ऐकतो चांद ताऱ्यांमधे
चंद्र ताऱ्यांची या शपथ
तू गात रहा गाण्यामधें ... ॥ गा गीत ... ॥३॥

●

# ॥ ही पाऊले ॥

ही पाऊले वळाली
प्रितीत या जुळाली
हे शद्ब फूल झाले
ही प्रित दिव्य जाहली ... ॥ धृ ॥

किती दिवस मुग्ध होतो
उरी स्मृती जपत होतो
स्मरे छबी तुझी ती
मज वाटे हवी हवीशी .... ॥ ही पाऊले

कधी रात्र–रात्र जागे
स्वप्नात अधर जुळती
येंशी अधीर होऊनी
स्वप्ने कशी ती विरती ... ॥ हीं पाऊले ॥ २ ॥

●

## ॥ गंध धुंद आठवणी ॥

गंध–धुंद आठवणी
धुंद मधूर मिलनी
ये प्रिये जवळीये
गाऊ मधुर गाणी ... ॥ गंध धुंद ॥ धृ ॥

कशी–कुठे–कशास ?
प्रश्न–प्रश्न जुळविता
मनांत मुग्ध भावना
स्वरांत उमटल्या पुन्हा ... ॥ गंध–धुंद ॥१॥

हळूच ये, इथेच ये
कशास पुसती प्रश्न हे
तुझ्याच भाव–बंधना
दोघे सजवू या इथें ... ॥ गंध–धुंद ॥२॥

पुनवचान्द ढळला
प्राशिली तू माधुरी
दाटता धुके पहाट
मिठीत या रागिणी ... ॥ गंध–धुंद ॥३॥

## ॥ सखे ॥

भावनांच्या तारकांचे
दीप लाविले अंतरी
ज्योत माझी तूच होशी
उजळताच या अंतरी ... ॥धृ॥

का कुणा सांगू नको ते
दिव्य प्रेम आपुले
तारकांचे गुजगुंजन
वाळूतली प्रेमाक्षरे... ॥ भावनांच्या ॥१॥

तू दिलेले शंख-शिंपले
लक्ष चंदनी शृंखले
हर घडीला वाचतो ती
प्रेम पत्रे साक्षरें... ॥ भावनांच्या ॥२॥

ना आता भेटणेच ते
ना आता झुरणेच ते
चन्द्र ढळला स्मृतिचा तो
स्वर्गीच जाणे एकटे... ॥ भावनांच्या ॥३॥

# ।। ये ग प्रिये ।।

ये ग प्रिये माझ्या बाहूत ये ग,
नको ना जाऊ अशी
दूर नको जाऊ
ये ग प्रिये, माझ्या बाहूत ये ग... ।।धृ।।

तुझ्या वीण हा जीव कासावीस
हर एक घडीला तू मज हवीस
हर एक घडी ही असावी माझी
ये ग प्रिये, माझ्या बाहूत ये ग... ।।१।।

जाऊया आपण स्वप्नील दुनियेत
प्रितीचे पर्वत, जाईच्या वाटा
त्या वाटेवर ग, दोघे ग विरुनी जाऊ
ये ग प्रिये, माझ्या बाहूत ये ग... ।।२।।

गंधीत जीवन-धुंदीत जगणें
प्रितीचे घरकुल, सजवूया आपण
प्रित कळयांना ग –
फुलवू या आपण!
यें ग प्रिये, माझ्या बाहूत यें ग... ।।३।।

# ॥ सुस्कारे ॥

आता कुणास सांगू
व्यथा जळाल्या जीवाची
ना दुःख दूर जाई
ना स्वप्न लोप होई
आता कुणास सांगू .... ।।धृ।।

जुळल्या स्वरात माझ्या
कुणी घातली कुऱ्हाड
रक्ताळल्या मनास
मी सांत्वूच कैसा ? ... ॥ आता कुणास ॥१॥

स्वप्नें कुठूनी पडती
जी अश्रू वाहती नयनी
चित्रे तिचीच असती
मनी शांती नाही अंती ... ॥ आता कुणास ॥२॥

ना ती इथे असेल
एकलाच मी झुरे
उरतील त्या स्मृतिचे
दुर्दैवी सुस्कारे ... ॥ आता कुणास ॥३॥

●

# ॥ पोरका ॥

या व्यथांच्या कुंपणी
मी सदा हा गुंतलेला
ना कधी शांती जीवाला
मी असा हा संपलेला ... ॥धृ॥

आई ना बाबा जीवाचे
बहीण ना माझी मला
सोबती ना कुणी जीवाचे
ना कुणीच माझे मला ... या ॥ व्यथांच्या ॥१॥

आई म्हणूनी साद घालूनी
साद का ती देत नाही ?
ताई म्हणूनी हांक मारुणी
हांक का ती देत नाही ? .. ॥ या व्यथांच्या ॥२॥

काय सांगावे पित्याचा हात ना पाठीवरी
सोडूनी गेला कुठे तो , मी असा रस्त्यावरी
हांसती हे लोक सारे
मी असा पोरका भिकारी ... ॥ या व्यथांच्या ॥३॥

या व्यथित जीवनीया
माझेच अश्रू आश्रयाला
भेटती का कधी पुन्हा ते
माय ,बाप , बहिण मला ... ? ... ॥ या व्यथांच्या ॥४॥

●

## ॥ मैफिल ॥

ही मैफिल, हे सूर, हे तारे
हे प्रेम, स्पर्श सारे
असतात भावनांचे मशहूर खेळ सारे ... ॥धृ॥

आलीस लेवूनी तू
गंधीत नव सूरांनी
ते सूर-सूर कैसे
गुंजन कोकीळ जैसे ॥ ही मैफिल ॥१॥

भारावल्या मनाला
जवळी तू हवीशी
येता कधी उराशी
तो चंद्र प्रीत साक्षी ... ॥ ही मैफिल ॥२॥

आता न दूर जाणे
स्वप्नांत ना परतणे
हवी ती साक्ष-गंधीत
प्रीतित धुंद राहाणे ... ॥ ही मैफिल ॥३॥

# ॥ वळणाऱ्या वाटेवर ॥

वळणाऱ्या वाटेवर
भेट तुझी झाली
प्रितिच्या कळयांची
फुले ही झाली ... ॥धृ॥

रिमझिमत्या पावसांत
पाऊले जुळाली
भिजलेल्या ओठांनी
रात्र ही विझली ... ॥ वळणाऱ्या ॥१॥

का वर्षा थांबली ती
अकस्मात या नयनीं ?
सुखाच्या आसवांची
फुले मज जीवनी ... ॥ वळणाऱ्या ॥२॥

नको विरह क्षणकाळ
हुरहुर जाणवे ती
प्रित पाखरां माझ्या
विहरु या प्रीतीबनी ... ॥ वळणाऱ्या ॥३॥

# का उगा ?........

का उगा सूर्यास मी त्या
प्रार्थुनी तव प्रेम मागे
आसवांच्या उत्सवाखाली
सोडुनी तू का निघाला ... ॥१॥

देश सेवा व्रत तुझें ते
साध्य केले या रणांगणी
लढूनी शत्रूस केले निर्बल
लाविलेस रक्त तू कपाळी ... ॥२॥

शौर्य तुझे जिध्द तुझी
रक्षण्या भारतभूमी
नित्यनवे डाव मांडूनी
खेळ तू मोडूनी निघाला ... ॥४॥

मी तरी आनन्दी नेत्री
त्या तुझ्या शौर्य गाथेंतूनी
प्रार्थिते प्रतिमेस तुझिया
भक्ति प्रेमीं या मनानो ॥४॥

REFBK-0023403
REFBK-0023403

दोस्तांनो,

मी काही नामवंत कवी नाही. कवितेच्या भावविश्वात छोटीशी भरारी घेणारा मी रसिक आहे. मी जो काही 'शद्बगंध' रचला आहे, ती रचना माझी स्वतःची प्रामाणिक अनुभूती आहे. प्रितीच्या अनुषंगाने येणारे वैफल्य या अनुभूतीतून अधिकाधिक अभिव्यक्त केलेलं आहे. माणसाचं पहिलं प्रेम स्वतःवर असतं. या पर्यायाला माझं कविमन अपवाद नाहीं, स्वतःच्या प्रेमातून निर्माण झालेलं वैफल्य मनाला ग्रासलं ......आणि शद्बगंधाची निर्मिती झाली बस्स ! माझ्या बाबतीत येवढेच ! शेवटी, आपल्या सारख्या काव्य रसिकांची 'शद्बगंधाला' मिळणारी दाद हीच माझ्या पुढील काव्य रचनेची प्रेरणा होय !

यनांही विसरता येणार नाही.

सर्वश्री मधुकर आरकडे, देवदत्त साने, सुदेश हींगलासपूरकर किशोर खांबे, राजन देसाई, किरण तांबें, प्रदीप गुजर, बाळ सावंत, शशिकांत सावंत आणि...............

माझ्या गीतांना स्वरबद्ध करणारा संतोष जाधव
या सर्वांचा शद्बगंध' कायमचा ऋणी आहे !

-सुभाष धोत्रे-
ठाणे

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२७३८
२३४०३
काव्य
१७।७।९२

सुभाष धोत्रे
ठाणें

## प्रकाशित साहित्य

कुंकू (कादंबरी)

☆ कथा

'असीम त्याग'

(आकाश वाणीवरुन

प्रसारीत)

'निष्पाप'

(आकाश वाणीवरुन

प्रसारीत)

'जास्वंदी'

'ओठ'

'रुफटेरेस'

☆ काव्यसंग्रह

'शब्दगंध'

## आगामी साहित्य

☆ कादंबरी

'भोग'

'सापळा'

'सुनंदा'

☆ कथा

भूक

ईटचा

जळलेलं वृंदावन

सुप्रिया

पद्‌

निष्पाप हात

☆ काव्यसंग्रह

'रक्त पुष्प'

'क्षितिज'

'मुखवटे'

☆ चरित्र

'महम्मद रफि'